SAKAL, Thane, 13.12.2024
Page No. 2, Size:(7.08)cms X (4.79)cms.

**Safety awareness among bullet train workers**

# बुलेट ट्रेन मजुरांमध्ये सुरक्षेबाबत जनजागृती

मनोर, ता. १२ : मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाअंतर्गत बांधकामांच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जात आहे. कामगारांमध्ये सुरक्षिततेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी 'प्रयास' नामक पथनाट्याचे प्रयोग आयोजित करण्यात आले होते.



मनोर : सुरक्षेबाबत कामगारांमध्ये जनजागृती करण्यात आली.

या पथनाट्याच्या मालिकांचे प्रयोग बुलेट ट्रेन प्रकल्पाची बांधकामे सुरू असलेल्या ५० ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. यातून सात हजार मजुरांना कामाच्या ठिकाणी घ्यावयाच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. जून महिन्यात आयोजित केलेल्या प्रयोगांची पुनरावृत्ती सहा महिन्यांनी केली जात आहे. डिसेंबर महिन्यात 'प्रयास' नामक पथनाट्याच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील बुलेट ट्रेन प्रकल्पाची बांधकामे सुरू असलेल्या सर्व ठिकाणी पथनाट्याचे प्रयोग पूर्ण झाले आहेत. यात सुमारे दोन हजार मजुरांनी भाग घेतला होता.

LOKSATTA, Mumbai, 13.12.2024
Page No. 4, Size:(6.16)cms X (9.06)cms.

**Safety lessons for 9 thousand workers of bullet train**

# बुलेट ट्रेनच्या ९ हजार कामगारांना सुरक्षेचे धडे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाची पायाभूत कामे गुजरातसह महाराष्ट्रात वेगाने सुरू आहेत. नुकताच या प्रकल्पातील वांद्रे-कुर्ला संकुल येथे भूमिगत स्थानकाच्या उभारणीतील महत्वाचा टप्पा असलेला पहिला बेस स्लॅब टाकण्याचे काम पूर्ण झाले. तर, बुलेट ट्रेन प्रकल्पाची कामे सुरक्षित पार पडण्यासाठी बांधकामाच्या स्थळी कार्यरत कर्मचाऱ्यांना सुरक्षेबाबतची माहिती देण्यात आली. 'नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड' द्वारे आतापर्यंत ९ हजार कामगारांना सुरक्षेचे धडे देण्यात आले आहेत.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या बांधकामस्थळी उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, गुजरात आणि महाराष्ट्रातील कुशल व अकुशल कामगार काम करत आहेत. बुलेट ट्रेनच्या प्रकल्पाचे बांधकाम ५० वेगवेगळ्या ठिकाणी होत आहे. प्रकल्पातील बांधकाम स्थळांवरील सुरक्षिततेबाबत जागरुकता पसरवणे, कामगारांना पटकन समजेल, अशा पद्धतीने मार्गदर्शन करण्यासाठी "प्रयास" नावाची नाट्यमालिका सुरू केली. जून २०२४ मध्ये वांद्रे-कुर्ला संकुल या स्थानकाच्या जागेवर पहिले नाटक झाले. तर, त्यानंतर ठाणे, पालघरमध्ये सुरक्षेचे धडे देण्यात आले. पहिल्या टप्प्यात ७ हजार कामगारांना सुरक्षेबाबत जागरुकता करण्यात आली. डिसेंबर २०२४ मध्ये दुसऱ्या टप्प्यात वांद्रे-कुर्ला संकुल, विक्रोळी, घणसोली, ठाणे, नालासोपारा, विरार, पालघर आणि डहाणू येथील दोन हजार कामगारांना सुरक्षेचे धडे दिले. त्यात कामगारांना उपकरणांचा योग्य वापर याबाबत मार्गदर्शन केले.

PUNYNAGARI, Mumbai, 12.12.2024
Page No. 3, Size:(8.97)cms X (5.58)cms.

**Training of workers for bullet trains**

# बुलेट ट्रेनसाठी कामगारांना प्रशिक्षण



**मुंबई** : मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत कामगारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत प्रयास नावाचे पथनाट्य बसवण्यात आले आहे. बुलेट ट्रेनच्या महाराष्ट्रातील ५० बांधकाम साईटवर पहिल्या टप्प्यात हे पथनाट्य आयोजित करण्यात आले होते. या दरम्यान ७००० कामगारांना सुरक्षिततेचे महत्त्व आणि फायदे याची माहिती देण्यात आली. महाराष्ट्रातील साईटवर सुरक्षिततेसाठी पथनाट्य आयोजित केल्यानंतर आता दुसरा टप्पा डिसेंबर २०२४ मध्ये सुरू झाला आहे. सुमारे २००० कामगारांनी या प्रयत्नात भाग घेतला असून बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, विक्रोळी, घणसोली, ठाणे, नालासोपारा, विरार, पालघर आणि डहाणू परिसर अशा विविध ठिकाणी ही पथनाट्ये सादर करण्यात आली.

SAKAL, PALGHAR, 13.12.2024
Page No. 2, Size:(6.31)cms X (11.23)cms.

**Safety awareness among bullet train workers**

# बुलेट ट्रेन मजुरांमध्ये सुरक्षेबाबत जनजागृती

मनोर, ता. १२ (बातमीदार) : मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाअंतर्गत बांधकामांच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जात आहे. कामगारांमध्ये सुरक्षिततेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी 'प्रयास' नामक पथनाट्याचे प्रयोग आयोजित करण्यात आले होते.

या पथनाट्याच्या मालिकांचे प्रयोग बुलेट ट्रेन प्रकल्पाची बांधकामे सुरू असलेल्या ५० ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. यातून सात हजार मजुरांना कामाच्या ठिकाणी घ्यावयाच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. जून महिन्यात आयोजित केलेल्या प्रयोगांची पुनरावृत्ती सहा महिन्यांनी केली जात आहे. डिसेंबर महिन्यात 'प्रयास' नामक पथनाट्याच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील बुलेट ट्रेन प्रकल्पाची बांधकामे सुरू असलेल्या सर्व ठिकाणी पथनाट्याचे प्रयोग पूर्ण झाले आहेत. यात सुमारे दोन हजार मजुरांनी भाग घेत स्वतःला सुरक्षित ठेवण्याबाबत जागरूकता निर्माण केली. बुलेट ट्रेन प्रकल्प उभारणीसाठी काम करणाऱ्या मजुरांना सुरक्षित आणि संरक्षित कामाचे ठिकाण उपलब्ध करून देण्याच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे. पथनाट्याचे प्रयोग बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, विक्रोळी, घणसोली, ठाणे, नालासोपारा, विरार, पालघर आणि डहाणू येथील बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी सादर करण्यात आल्याची माहिती नॅशनल हाय स्पीड रेल्वे कॉर्पोरेशनच्या प्रवक्त्यांनी दिली.



मनोर : सुरक्षेबाबत कामगारांमध्ये जनजागृती करण्यात आली.

PRAHAAR, Mumbai, 15.12.2024
Page No. 4, Size:(8.93)cms X (7.21)cms.

**Bullet train project workers safe work mantra from street theater!**

# बुलेट ट्रेन प्रकल्पातील कामगारांना पथनाट्यातून सुरक्षित कामाचा मंत्र!

## नाट्यातून नऊ हजार कामगारांना सुरक्षा, जागरूकता यांचे पटवले महत्त्व

प्रशांत सिनकर



ठाणे : बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम सुसाट वेगाने सुरू असताना, प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांची सुरक्षा तितकीच महत्त्वाची आहे. काम करताना कोणत्याही कामगाराला दुखापत होणार नाही याची काळजी संबधित विभाग घेत आहे. मात्र कामगारांनी देखील सुरक्षित काम कसे करावे यासाठी "प्रयास" नावाच्या पथनाट्याची मालिका सुरू केली आहे. प्रकल्पाच्या ५० ठिकाणी पथनाट्यातून सात हजार कामगारांना सुरक्षेचा मंत्र आणि त्याचे फायदे समजावले आहेत.

परदेशात अथवा चित्रपटात धावणारी बुलेट ट्रेन सर्वांनीच पहिली असली तरी आता प्रत्यक्षात पुढच्या काही दिवसात धावताना दिसणार आहे. मुंबई-ठाणे-पालघर जिल्ह्यातून थेट गुजरात राज्याला जोडणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची उत्सुकता सर्वांना लागून आहे. त्यामुळे प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांना उत्साह वाढवा आणि सुरक्षित काम करता यावे यासाठी पाठ नाट्यातून कामगारांना सजग करण्याचा प्रयत्न केला आहे. जून २०२४ मध्ये, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत कामगारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत "प्रयास" नावाच्या पथनाट्याची मालिका आयोजित केली होती. ही मालिका प्रकल्पाच्या ५० साईट्सवर आयोजित करून सात हजार कामगारांना सुरक्षिततेचे महत्त्व आणि फायदे याबद्दल जागरूक केले.

आता पथनाट्याचा दुसरा टप्पा डिसेंबर २०२४ मध्ये सुरू झाला आहे. ज्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व ठिकाणी पथनाट्ये पूर्ण झाली आहेत. सुमारे दोन हजारकामगारांनी या प्रयत्नात भाग घेतला आणि सुरक्षिततेच्या जागरुकतेच्या फायद्यांशी परिचित झाले. हा प्रयत्न कामगारांना सुरक्षित आणि सुरक्षित कामाची जागा देण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, विक्रोळी, घणसोली, ठाणे, नालासोपारा, विरार, पालघर आणि दहाणू परिसर अशा विविध ठिकाणी ही पथनाट्ये सादर करण्यात आली.